लोकमत

# दूरशिक्षण केंद्राच्या संचालकपदी दिनकर मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



दूरशिक्षण केंद्राच्या संचालकपदी प्रा. डॉ. दिनकर खाशाबा मोरे यांची निवड झाली आहे. ते आज, सोमवारी पदभार स्वीकारणार आहेत. पूर्णवेळ संचालकांची नियुक्ती झाल्याने प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रक्रियेची विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) मान्यता मिळविण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे. या दूरशिक्षण केंद्राला पूर्णवेळ संचालक नसल्याची त्रुटी दाखवून प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रक्रियेची मान्यता रोखली आहे. त्यामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सुमारे चार हजार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची अडचण झाली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या दोन आठवड्यांपूर्वी विद्यापीठाने या संचालकपदासाठी दाखल झालेल्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया पूर्ण केली. त्यातून मुलाखतीसाठी दोन उमेदवार पात्र ठरली. मुलाखत प्रक्रिया बुधवारी झाली. त्यातून डॉ. मोरे यांची संचालकपदी निवड झाली आहे.

पुढारी

# ‘दूरशिक्षण’च्या संचालकपदी डॉ. मोरे यांची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या संचालकपदी प्रा.डॉ.दिनकर खाशाबा मोरे यांची निवड झाली आहे.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राला पूर्णवेळ संचालक नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रथम वर्षाचे प्रवेश थांबवले होते. या पार्श्वभूमीवर तातडीने विद्यापीठाने संचालकपदी डॉ. मोरे यांची नेमणूक केली आहे. डॉ. मोरे यांनी के.आर.पी.कन्या महाविद्यालय इस्लामपूर येथे ३५ वर्षे अध्यापन केले आहे. पाच वर्षे ते अधिसभा सदस्य होते. ॲकॅडमिक कौन्सिलवर दहा वर्षे काम केले आहे.

27 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास सर्वसाधारण विजेतेपद

## गार्डन क्लबतर्फे आयोजित पुष्प प्रदर्शन व स्पर्धा; विविध ३५ गटांत ५८ पारितोषिके



**कोल्हापूर : विजेतेपदाची ट्रॉफी अरुण नरके यांच्या हस्ते स्वीकारताना विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभिजित जाधव व इतर.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गार्डन क्लब आणि राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या पुष्प प्रदर्शन व स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने विविध ३५ गटांत एकूण ५८ पारितोषिके प्राप्त करत यंदाही सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विद्यापीठाने विविध स्पर्धांमध्ये १३ प्रथम क्रमांक, २६ द्वितीय आणि १९ तृतीय अशी एकूण ५८ पारितोषिके प्राप्त केली.

यावेळी समारंभाचे अध्यक्ष अरुण नरके यांच्या हस्ते विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सर्वसाधारण विजेतेपदाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे जिल्हा कृषी अधीक्षक ज्ञानदेव वाकुरे, गार्डन क्लबच्या अध्यक्ष कल्पना सावंत, उपाध्यक्ष शशिकांत कदम, सचिव पल्लवी कुलकर्णी, कोषाध्यक्ष राज अथणे उपस्थित होते.

2 7 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवरायांचा महिलांविषयक विवेकी दृष्टीकोन

## इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांचे प्रतिपादन : 'छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन'चे विद्यापीठात प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराजांचा महिलांविषयीचा दृष्टीकोन अत्यंत विवेकी आणि वास्तववादी होता. शिवरायांचे महिलांविषयीचे विचार प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन लिखीत 'छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन'च्या प्रकाशन सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कारकिर्दीत महिलांकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टीकोन कसा असला पाहिजे, किती उदात्त असला पाहिजे, याचा वस्तुपाठ देणारे अनेक प्रसंग आहेत. महिलांचा सन्मान केला पाहिजे. सुरत लुटीवेळी व्यापाऱ्याचे नुकतेच निधन झाले होते. तेव्हा त्याच्या पत्नी व कुटुंबाला अभय देऊन त्यांचे घर त्यांनी लुटीपासून सुरक्षित राखले, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्या पुढे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा विवेकी भला दृष्टीकोन लक्षात घेऊन शाहिस्तेखान लाल महालातील जनानखान्यात जाऊन लपला. महाराजांनी त्यावेळी जनानखान्यात जाऊन त्याच्यावर हल्ला करायला त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. जनानखान्यातील महिलांना त्यांनी कोणताही त्रास दिला नाही. त्यांनी आपल्या सैन्यालाही महिला व बालकांना चुकूनही त्रास न देण्याच्या कडक सूचना दिल्या होत्या, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी महाराजांचे प्रशासकीय कौशल्य, व्यवस्थापन कौशल्याविषयी तपशीलाने संशोधनाची गरज आहे. डॉ. महाजन यांनी त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाची मांडणी करून याला तोंड फोडले आहे. अभ्यासकांनी व्यवस्थापन कौशल्यावर प्रकाश टाकण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांचेही भाषण झाले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. श्यामसुंदर मिरजकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : डॉ. श्रीकृष्ण महाजन लिखीत 'छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन'चे प्रकाशन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. अवनीश पाटील, डॉ. महाजन, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. मंजुश्री पवार, श्यामसुंदर मिरजकर.

यावेळी वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, विलास सोयम, डॉ. के. आर. मारुलकर, प्रा. शोभा शेटे, अविनाश भाले आदी उपस्थित होते.